# येशू हा सैतानापेक्ष अधिक शक्तीमान आहे आणि लोकांची सैतानाच्या जुलूमातून सुटका करतो

मुलांना शिकवणाऱ्यांनी D2b हा अभ्यास वाचावा

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू येशू, तू स्वर्गतून पृथ्वीवर सत्ता चालवतोस. कृपा करून, आमच्या समाजातील तुझ्याकडे वळणाऱ्या सर्वांची अशुद्ध आत्म्यां पासून सुटका करून तू आपली प्रीती व सामर्थ्य दाखव.''

लोकांच्या गरजांना अनुरूप असे कार्यक्रम निवडा.


1. **सैतानाच्या जुलूमाला बळी पडलेल्या लोकांशी येशूच्या नावात व्यवहार करण्यासाठी प्रार्थना व वचनाच्या द्वारे स्वतःची तयारी करा.**

**टीपः** सैतान एखादया व्यक्तीवर जुलूम करतो तेव्हा त्या व्यक्तीला भूत लागले, दुष्ट आत्म्याने किंवा अशुद्ध आत्म्याने पिडले असे पवित्र शास्त्र म्हणते, शारीरिक आजार आणि आध्यात्मिक जुलूम अशा दोन्ही गोष्टी येशू बऱ्या करून आरोग्य देतो. सैतान व्यक्तीवर जुलूम करून लोकांना विचित्रपणे वागायला लावतो परंतु पवित्र शास्त्राचे अचूक भाषांतर केले तर, आत्मे व्यक्तीवर 'मालकी हक्क' सांगतात किंवा एखाद्याचा आत्मा त्यांच्या 'मालकीचा' होतो असे त्यात कोठेही सांगितलेले नाही.

लोकांची भूतांपासून कशी सुटका करायची हे येशूने आपल्या शिष्यांना दाखवले. येशूने एका परराष्ट्रीय भूतग्रस्त मुलीची सुटका कशी केली ते मत्तय 15:22–28 मध्ये पाहा.

- आपल्या मुलीच्या वतीने येशूकडे कोणी मदत मागितली? *(पाहा वचन 22)*
- त्या भूताने मुलीला काय केले?
- त्या बाईच्या बाबतीत येशूच्या शिष्यांनी काय करण्याचा प्रयत्न केला? *(23)*
- ती बाई नीतिमान आणि मदत मिळण्याच्या योग्यतेची होती का? *(23–27)*
- आईच्या कोणत्या गुणांची येशूने प्रशंसा केली? *(28)*
- येशूने त्या बाईला कशाची खात्री दिली?
- ती मुलगी किती वेळात बरी झाली?





येशूने एका यहूदी मुलाची भूतापासून कशी सुटका केली ते **मत्तय 17:14–21** मध्ये पाहा.

- आपल्या मुलाच्या वतीने येशूकडे कोणी मदत मागितली? *(पाहा वचन 14)*
- ते भूत त्या मुलाला काय करीत होते? *(15)*
- येशूचे शिष्य त्या मुलाच्या बाबतीत कोणत्या गोष्टीत अपयशी ठरले? *(16)*
- कोणत्या प्रकारच्या लोकांना दुष्ट आत्म्यांचा सर्वात अधिक त्रास होतो? *(17)*
- येशूने भूताला काय सांगितले व काय केले? *(17 व 18)*
- येशूच्या शिष्यांना ते भूत का घालवता आले नाही? *(20)*

- दुष्ट आत्म्यांना घालवून देण्यासाठी आपण काय करणे अगत्याचे आहे? *(21)*

सैतानावरील सामर्थ्याच्या बाबतीत येशूचे शिष्य काय शिकले ते लूक 10:17-20 मध्ये पाहा.

- शिष्यांना कोणत्या अधिकाराने लोकांची भूतांपासून सुटका करण्याचे सामर्थ्य होते? *(पाहा वचन 17)*
- येशूने त्याच्या शिष्यांना असलेल्या अधिकाराचे वर्णन कसे केले आहे? *(18)*
- विश्वास ठेवणारे शिष्य आणि दुष्ट आत्मे यापैकी शक्तीशाली कोण आहे? *(20)*
- विश्वासणाऱ्यांना आत्म्यांवरील अधिकारा पेक्षा अन्य कोणत्या गोष्टीचा अधिक आनंद होतो?

येशूच्या शिष्यांनी लोकांची भूतांपासून सुटका केली.

पौल व सीला ह्या प्रेषितांनी एका मुलीमधील पिशाच्चाला कसे धमकावले ते **प्रे. कृ. 16:16-19** मध्ये पाहा.



- कोणत्या प्रकारचे पिशाच्च त्या मुलीवर जुलूम करीत होते? *(पाहा वचन. 16)*
- पिशाच्चाने पछाडलेल्या मुलीचा लोक स्वार्थासाठी कसा उपयोग करून घेत?
- पौल व त्याचे सहकारी कोण आहेत हे त्या पिशाच्याला माहित होते का? *(17)*
- पौलाने त्या पिशाच्यावर कशी मात केली? *(18)*



- ते पिशाच्च त्या मुलीला कधी सोडून गेले? *(18)*
- त्या मुलीच्या धन्याने काय केले? *(19-21)*

प्रेषित पौलाने एका समाजाची दुष्ट आत्म्यांपासून कशी सुटका केली ते प्रे. कृ. 19:11-20 मध्ये पाहा.

- पौलाला दुष्ट आत्म्यांवर कोणत्या प्रकारचा अधिकार होता *(पाहा वचने 11 व 12)*
- विश्वास नसणाऱ्यांनी येशूच्या नावाचा उपयोग करण्याचा प्रयत्न केला तेव्हा काय घडले? *(13-16)*
- दुष्ट आत्म्यांना पिटाळून लावण्यासाठी आम्ही कोणाच्या नावाचा धावा केला पाहिजे? *(17)*
- लोकांची दुष्ट आत्म्यांपासून सुटका झाल्यावर त्यांनी आपल्या जादूटोणा करण्यासाठी लागणारे साहित्य व जादूटोणा ळकरव्याची सवय ह्या गोष्टींचे काय केले पाहिजे? *(18-19)*
- आम्ही लोकांची दुष्ट आत्म्यांपासून सुटका करतो तेव्हा आम्ही कोणता संदेश सांगणे अगत्याचे आहे? *(20)*

**2. सहकाऱ्यांशी चर्चा करून पुढील आठवडयातील कार्यक्रमांची योजना आखा.**

- तुमच्या समाजातील लोकांना कोणत्या प्रकारचे दुष्ट आत्मे त्रास देतात त्यावर चर्चा करा.
- तुमच्या सहकाऱ्यांपैकी किंवा विश्वासणाऱ्यांपैकी कोणाला प्रभूने भूताची बाधा झालेल्यासाठी प्रार्थना करण्याची प्रेरणा दिली असेल आणि ते भूत निघून गेलेले त्यांनी पाहिले असेल तर अशा लोकांची चौकशी करा.

- एकत्रित प्रार्थना करून भूताने पछाडलेल्या कोणत्या लोकांकडे तुम्ही जाऊन प्रार्थना द्वारे त्यांची सुटका करावी हे प्रभूला दाखवण्यासी विनंती करा.
- भूतबाधा झालेल्या लोकांची सुटका करण्याचा दांडगा अनुभव असणाऱ्या ख्रिस्ती सेवकाची भेट घेऊन त्यांच्या अनुभवाविषयी विचारा.
- ज्यांची सुटका व्हावी म्हणून तुम्ही प्रार्थना करणार आहात त्यांना येशूची सुवार्ता कशी सांगायची याची एकमित तयारी करा.
- तुम्ही भुते काढण्याच्या प्रयोगाचे प्रदर्शन मांडणार नाही अगदी गरजू असणाऱ्यांकडेच जाल आणि येशूची सुवार्ता जाहिरपणे सांगाल यावर तुमचे एकमत असावे.

**3. सहकाऱ्यांयांशी चर्चा करून पुढील उपासनेसाठीच्या वेळेची योजना आखा.**

येशू आणि त्याच्या शिष्यांनी लोकांची भूतांच्या कचाटयातून सुटका केली त्याचे वृत्तांत वाचा किंवा लक्षात ठेवून सांगा. तुम्ही भाग 1 मधील वृत्तांत सांगणार असाल तर तेच प्रश्न तुम्हांला विचारता येतील.भूतबाधे पासून सुटका झालेल्या व्यक्तीची विश्वासणाऱ्यांनी माहिती सांगावी.

सैतानाच्या जुलूम दडपशाही बद्दलच्या काही वास्तव गोष्टीचे स्पष्टीकरण करा:

- बहुतेक आजारपण हे देवाच्या परवानगीने येते? त्यात भुतांचा किंवा सैतानाचा संबंध नसतो.
- लोकांच्या पापमय वर्तणुकीचा आरंभ अंत:करणातून होतो, भूतांपासून नाही.
- देवापेक्षा आम्हांला अधिक सामर्थ्य आहे अशी भीती घालून सैतान व त्यांची भुतावळ लोकांची फसवणूक करतात.
- भूतबाधा झालेल्या लोकांची सुटका होण्यासाठी प्रार्थना करण्याचा अधिकार सर्व विश्वासणाऱ्यांना आहे.
- शुभवर्तमानाच्या आमच्या शिक्षणामध्ये भूते ढवळाढवळ करतात तेव्हा आम्ही त्यांना तेथून निधून जाण्याची आज्ञा केली पाहिजे,

मुलांनी तयारी केलेल्या गोष्टी त्यांना सादर करू द्या.

प्रभुभोजनाचा परिचय करून देण्यासाठी योहान 13:21-27 वाचा. अत्यंत पवित्र अशा शेवटल्या भोजनाच्यावेळी यहूदाने कपटाने येशू बरोबर भाकर मोडली आणि मग सैतान यहूदाच्या अंगात शिरला.

दोन वा तीनजणांचे गट करा. प्रार्थना करून एकमेकांना प्रोत्साहन द्या आणि योजना आखा.

**पाठ करा मत्तय 8:16**

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net